यमपूरीभोगावया॥ ३॥ तुकाह्मणेकरींब्रह्मांडठेंगणे॥
हातपसरीजीणेधीगत्याचें॥ ४॥ ॥१८६२॥
गोडनावेक्षीर॥ परीसाकरेचाधीर॥ १॥ तैसेंजाणावें
तेंज्ञान॥ बापुडेंतेंभक्तीविण॥ २॥ रुचिनेदीअन्न॥
ज्यांनसतांलवण॥ ३॥ आंधळ्याषेश्रम॥ शिकवि
ल्याचेंचिनाम॥ ४॥ तुकाह्मणेतारा॥ नावतंबुऱ्याच्या
सारा॥ ५॥ ॥१८६३॥
नघझालाभूतां॥ तेणेंकोंडीलेंअनंता॥ १॥ हेंचिशूरत्वा
चेंअंग॥ हरिआणिलाश्रीरंग॥ २॥ अवघाझालाप
ण॥ लवणसकळाकारण॥ ३॥ तुकाह्मणेपाणी॥ पा
तळपणेंतळाआणी॥ ४॥ ॥१८६४॥
आपुल्यामहिम्यानें॥ धातुपरिसेंकेलेसोनें॥ १॥ तैसेंन
मानींमाझेआतां॥ गूणदोषपंढरिनाथा॥ २॥ गांवांमा
गीलवोहळ॥ गंगानमनींअमंगळ॥ ३॥ तुकाह्मणेमा
ती॥ केलीकस्तुरीनेंसरती॥ ४॥ ॥१८६५॥
आशाबद्धवक्ता॥ भयश्रोतयांच्याचित्ता॥ १॥ गातो

तेंहीं नाहीं ठावें ॥ तोंड वासी कांहीं द्यावें ॥ २॥ झालेंलो
भाचें मांजर ॥ भीक मागे दारोदार ॥ ३॥ उभयतांलो
भीमन ॥ वायां गेलें तें भजन ॥ ४ ॥ बहिरे मुके येके ठाईं ॥
तैसे झाले तया दोहीं ॥ ५॥ माप आणि गोणी ॥ तुकाह्म
णे रीती दोन्हीं ॥ ६ ॥ ॥ १८६६ ॥
तक्र शिष्य मान ॥ कुग्ध ह्मणे नारायण ॥ १ ॥ ऐसीं ज्ञाना
चीं हो बंडे ॥ आशा विटंबीली मूढें ॥ २ ॥ उपदेश तो ज
गा ॥ आपण सोंवळा इतका मांगा ॥ ३ ॥ रसना शिस्ना
चे अंकित ॥ तुका ह्मणे वर्दळ स्फीत ॥ ४ ॥ ॥ १८६७ ॥
ब्रह्मचारी धर्म घोकावीं अक्षर ॥ आश्रमीं विचार षट्‍क
र्में ॥ १ ॥ वानप्रस्थ तरी संयोग वियोग ॥ सन्यास तो त्या
ग संकल्पाचा ॥ २ ॥ परमहंस तरी जाणे सहज वर्म ॥ ते
थें याति धर्म कुळ नाहीं ॥ ३ ॥ बोले वर्म जो चाले याविर
हित ॥ तो जाणा पतित श्रुति बोले ॥ ४ ॥ तुका ह्मणे कांहीं
नाहीं नेमावीण ॥ मोकळा तो शीण दुःख पावे ॥ ५ ॥
॥ १८६८ ॥
आह्मीं क्षेत्रींचे संन्यासी ॥ देह भरित ल्हपी केशी ॥ नाहीं
केली ऐसी ॥ आशा काम बोहरी ॥ १ ॥ आलें अयाचित
आंगा ॥ सहज तो आह्मा भागा ॥ दाता पांडुरंगा ॥ ऐसा
करितां निश्चिंति ॥ २ ॥ दंड धरिला दंडायमान ॥ मुळीं
मुंडिलें मुंडण ॥ वंदीं वंदीचा कोपिन ॥ बहिर्वासा औट
डे ॥ ३ ॥ काळें साधीयेला काळ ॥ मन करूनी निश्चळ ॥
लौकिकीं विटाळ ॥ धरुनि असों येकांत ॥ ४ ॥ कार्यका

रणाचीचाली ॥ वाचावाचत्वेंनेमिली ॥ येकानेमेंचा
ली॥ स्वरूपींचराहाणें ॥५॥ नव्हेवेषधारी॥ तुकाआहा
चवसीवरी॥ आहेतैसींबरीं॥ खंडेंनिवडीवेदांचीं॥ ६॥
॥ १८६९॥

निर्वाहापुरतें अन्न आच्छादन ॥ आश्रमासीस्थानको
पीगुहा॥ १ ॥ कोठेंहिचित्तांसीनसावेंबंधन ॥ ह्रदईंना
रायणसांठवावा॥ २॥ नयेबोलोफारबैसोंजनामधीं॥
सावधानबुद्धिकरूनीठेवीं ॥ ३ ॥ तुकाह्मणेघडीघडीनें
साधावी॥ त्रिगुणाचीगोवीउगवोनी ॥ ४॥ १८७० ॥

याचिनावेंदोष॥ राहेअंतरींकिल्मिष ॥ १ ॥ मनाअंगीं
पुण्यपाप ॥ शुभउत्तमसंकल्प॥ २॥ बिजाऐसींफळें॥
उत्तमकांअमंगळें॥ ३॥ तुकाह्मणेचित्त ॥ शुद्धकरावें
तेंहित ॥ ४॥ ॥ १८७१ ॥

कुशळवक्तानव्हेजाणीवतोश्रोता ॥ राहेभावचित्ताध
रूनियां॥ १ ॥ धन्यतोचिजगींधन्यतोचिजगीं ॥ ब्रह्म
तयाअंगींवसतसे॥ २॥ नधोवीतोंडनकरीआंघोळी॥
जपेसदाकाळींरामनाम ॥ ३ ॥ जपतपध्याननेणेयाग
युक्ति ॥ कृपाळुजोभूतींदयावंत ॥ ४ ॥ तुकाह्मणेहो
यजाणूनीनेणता ॥ आवडेअनंताजिवाहूनि ॥ ५ ॥
॥१८७२॥

काळाचीतेसत्तातेनाहींघटिका॥ पंढरिनायकाआठवि
तां ॥ १ ॥ सदाकाळगणनाकरीआयुष्याची ॥ कथे
च्यावेळेचीआज्ञानाहीं ॥ २ ॥ याकारणेंमाझ्याविठो

बाचीकीर्ति ॥ आहेत्रिजगतींथोरवट ॥ ३ ॥ तुकाह्मणे
जन्माआलियाचेंफळ ॥स्मरावागोपाळतेंचिखरें॥४॥
॥१८७३॥
घरोघरींझालेकवी ॥ नेणेप्रसादाचीचवी ॥१ ॥ लंडाभू
षणाचीचाड ॥ पुढेंनविचारीनाड॥२॥ काढावें आंईतें॥
तेंचिजोडावेस्वहितें ॥ ३ ॥ तुकाह्मणेकळे॥ आहाचझां
कतीलडोळे ॥ ४ ॥ ॥१८७४॥
नयेपाहोंमुखमात्रागमन्याचें॥तैसें अभक्तांचेंगुरुपुत्रा
॥ १ ॥ह्मणवूनीवरेंधरितांयेकांत ॥ तेणेंनव्हेघातभज
नासी ॥ २॥ नयेहोऊंकदानिंदकाचीभेटी ॥ जयाद्वैतपो
टींचांडाळाच्या ॥ ३ ॥ तुकाह्मणेनकाबोलोंत्यासीगो
ष्टी ॥ जयाचियेदृष्टींपापवाढे ॥ ४ ॥ ॥१८७५॥
बाळपणींऐशींवरुषेगेलींबारा ॥ खेळतांयापोरानाना
मतें॥१॥विटिदांडूचेंडूवाघोऱ्यावाघोडी॥ चंपेपेंडघडी
येकीबेकी॥२॥हमामाहुंबरीपकव्याच्याबारे॥ खेळेजं
गीभोंवरेचुंबाचुंबी॥३॥सेलडेराआणिनिसरभोवंडी॥
उचलीबालधोंडीअंगबळें ॥ ४॥ तुकाह्मणेऐसेंबाळप
णगेलें॥ मगतारुण्यआलेंगर्वमूळ॥५॥ ॥१८७६॥
तारुण्याचेमदेंनमानीकोणासी ॥ सदामुसमुसीधुळी
जैसा ॥ १ ॥ आढोनीवेढोनीबांधलामुंडासा॥ फिरत
सेह्मैसाजनामध्यें ॥ २ ॥ हातींदीडपानवरतिचमान॥
नाहींतोसन्मानभलीयासी ॥ ३ ॥ श्वानाचियेपरीहिंडे
दारोदारीं॥पाहेपरनारीपापदृष्टी॥४॥ तुकाह्मणेऐसीथो

रहानिझाली॥करितांटवाळीजन्मगेला॥ ५॥१८७७॥
झातारपणींथोटेपडसेंखोकला ॥ हातकपाळालालाउ
निबैसे ॥ १ ॥ खोबऱ्याचीवाटीझालेंअसेमूख॥ गळ
तसेनाकश्लेष्माप‍ूरीं॥ २ ॥ बोलोंजातांशब्दनयेचिहा
नीट॥ गडगर्डाकंठकफभारी ॥ ३ ॥ शेजारीह्मणतीम
रेनाकांमेला ॥ आणिलाकंटाळायेणेंआह्मा ॥ ४ ॥ तु
काह्मणेआतांसांडोनियांकाम ॥ स्मरारामरामक्षण
क्षणा॥५॥ ॥१८७८॥
प्रल्हादाकारणेंनृसिंहझालासी ॥ त्याचियाबोलासीस
त्यकेलें॥१॥ रामकृष्णगोविंदनारायणहरी॥ गजेंराज
द्वारींभक्तराज॥२॥ विठ्ठलमाधवमुकुंदकेशव ॥ तेणेंदै
त्यरावदचकेमनीं॥३॥ तुकाह्मणेंतयाकारणेंसगूण ॥
भक्तांचेंवचनसत्यकेलें॥४॥ ॥१८७९॥
नामाचेंसामर्थ्यकांरेदवडोसी ॥ कांरेविसरसीपवाडे
हे॥१॥ खणखणाहाणितीखर्गप्रल्हादासी ॥ नरुपेअं
गासींकिंचितहि ॥ २ ॥ रामकृष्णऐसीमारितसेहाक॥
तेणेंफ्डेधाकबळियासी ॥ ३ ॥ असोंघासामर्थ्यऐसी
याकीर्तिची॥ आवडीतुक्याचीभेटीदेई॥४॥ १८८० ॥
वाटिभरीवीषदिल्हेंप्रल्हादासी ॥ निर्भरमानसींतुझ्या
बळें ॥ १ ॥ भोक्तानारायणकेलेंसेप्राशन॥ प्रतापेंजी
वनझालेंतुझ्या॥ २॥ नामाच्याचिंतनेंविषाचेंअमृत ॥
झालेंसेदेखतनारायणा ॥ ३ ॥ तुकाह्मणेऐसेतुझेबडि
वार॥ शिणलाफणिवरवर्णवेना॥ ४॥ ॥१८८१॥

अग्निकुंडामध्येंघातलाप्रह्लाद ॥ तरीतोगोविंदविसरे
ना॥१॥ पितीयासीह्मणेव्यापकश्रीहरी ॥ नांदतोमुरारी
सर्वांठाईं॥ २॥ अग्निरूपमाझासखानारायण ॥ प्रल्हा
दगर्जोनहाकमारी ॥ ३ ॥ तुकाह्मणेअग्निझालासेशी
तळ॥ प्रतापेंसकळविठोतुझ्या॥ ४॥ ॥ १८८२॥
कोपोनियांपितापुसेप्रल्हादासी ॥ सांगहृषीकेशीकोठें
आहे॥ १ ॥ येरुह्मणेकाष्ठींपाषाणींसकळीं ॥ आहेवन
माळीजेथेंतेथें ॥ २ ॥ खांबावरिलातमारिलीदुर्जनें॥
स्तंभींनारायणह्मणतांची ॥ ३ ॥ तुकाह्मणेऐसाखांब
कडाडिला॥ ब्रह्मांडचकलासत्यलोकीं॥ ४॥ १८८३॥
डळमळिलामेरूआणितोमांदार ॥ पाताळींफणिवर
डोईझाडी॥ १॥ लोपेतेजेंसूर्यआणिकहाचंद्र॥ कांपत
सेइंद्रथरथरां॥ २॥ ऐसेंरूपउग्रहरीनेंधरिलें॥ दैत्यामा
रियेलेंमांडीवरी॥ ३ ॥ तुकाह्मणेभक्ताकारणेंश्रीहरि ॥
बहुदुराचारीमर्दियेले॥४॥ ॥१८८४॥
दिवाळखोरनारायण ॥ यावरिबहुतांचेंरिण॥ १ ॥ उ
ठतांचिउभेदारीं॥ अवघेंदेह्मणतीहरी॥ २ ॥ माजघ
रींदडेहरी॥ मायातडकीआडकरी॥ ३॥ युगायुगींचेंहें
ऋण॥ ह्मणोनीधरिलेंसेमौन ॥ ४ ॥ रोखापत्रपाहीं॥
वेदशास्त्रेंदेतीग्वाही ॥ ५ ॥ धनकोनामतुकावाणी॥
रिणकोनामविठ्ठलधणी॥ ६॥ ॥ १८८५॥
कायमाझेंनेतीवाईटह्मणोन ॥ करूंसमाधानकशासा

ठीं ॥ १ ॥ कायमजलोकनेतीपरलोका ॥ जातांकोणी
येकानिवारील ॥ २ ॥ नह्मणेकोणासीउत्तमवाईट ॥
सुखेंमाझीकूटखावोमागें ॥ ३॥ सर्वमाझाभारअसेपां
डुरंगा ॥ कायमाझेंजगासवेंकाज ॥४॥ तुकाह्मणेमाझें
सर्वहिसाधन ॥ नामसंकीर्तनविठोबाचें॥५॥ १८८६ ॥
जैसीतैसीतरी ॥ शरणांगतेंतुझीहरि ॥ १ ॥ आतांनपा
हिजेकेलें ॥ ब्रीदलटिकेंआपुलें ॥ २ ॥ शुद्धनाहींचित्त ॥
परिह्मणवीतोंभक्त ॥ ३ ॥ मजकोणपुसेरंका ॥ नामसां
गेतुझेंतुका ॥ ४ ॥ ॥ १८८७॥
नाशिवंतदेहनासेलहाजाणा ॥ करिउच्चारानावाचेरा
म ॥ १ ॥ नामेंचितारिलेकोटयानेंकोटी ॥ नामेंचिवैकुं
ठींवैसविले ॥ २ ॥ नामापरतेंसारनाहींत्रिभुवनीं ॥ तें
कांतुह्मीमनींआठवाना ॥ ३ ॥ तुकाह्मणेनामवेदासी
आगळें॥ तेंदिल्हेंगोपाळेंफुकासाठीं ॥४॥ ॥ १८८८ ॥
आळवीतीबाळें ॥ मातेतेंसुखआगळें ॥ १ ॥ द्यावेंआ.
वडीभातुकें ॥ पाहेनीवेकवतुकें ॥ २ ॥ लेवऊनिअळं
कार ॥ दृष्टिकरावीसादर ॥ ३ ॥ आपुलीयापदीं ॥ बैस
ऊनीकोडेंबंदी ॥ ४ ॥ नेदिलागोदिठी ॥ उचलोनीलावि
कंठीं ॥ ५ ॥ तुकाह्मणेलाभा ॥ वरिघ्यावेंपद्मनाभा ॥६॥
॥ १८८९ ॥
तपतीर्थदानव्रतआचरण॥गातांहरिगुणवारूनये॥ १॥
कोटिकुळेंत्याचींवाटुळींपाहाती ॥ त्यांतयाघडतीब्रह्म
हत्या ॥ २ ॥ आपुलीयापापेंनसुटेसायासें ॥ कोणाका

ळें ऐसें निस्तरेल ॥ ३ ॥ व्हावें साव्यत याज घालावें भय ॥ फुकासाठीं पाहेला अपघात ॥ ४ ॥ तुका ह्मणे हित मानाया वचना ॥ सुखदुःख जाणा साधे फुका ॥ ५॥ १८९० ॥

देवासाठीं जाणा तयासीच आटी ॥ असेल ज्या गांठीं पुण्यरासी ॥ १ ॥ निर्बळा पाठवी बळें वाराणसी ॥ मेला आला त्यासी अर्धपुण्य ॥ २ ॥ कथे निद्राभंग करावा भोजनीं ॥ तया सुखा धणी पार नाहीं ॥ ३ ॥ यागीं ऋण घ्यावें घावें सुखलाही ॥ बुडतां चिंता नाहीं उभयतां ॥ ४ ॥ तुका ह्मणे वर्म जाणोनी करावें ॥ येक न घालावें येकावरी ॥५॥ ॥ १८९१ ॥

अग्निमाजी पडे धातु ॥ लीन होउनि राहे आतु ॥ होय शुद्ध न पवे घातु ॥ पटतं तु प्रमाण ॥ १ ॥ बाह्य रंगाचें कारण ॥ मिथ्या औघेचि भूषण ॥ गर्व ताठा हे अज्ञान ॥ मरण सवें वाहातसे ॥ २ ॥ पुरे मातलीया नदी ॥ लव्हाळा नांदे जीवन संधी ॥ वृक्ष उन्मळोनी भेदी ॥ परि तो कधीं भंगेना ॥ ॥ ३ ॥ हस्ती परदळ जो भंगी ॥ तया पाईं न मरे मुंगी ॥ कोण जाय संगीं ॥ पानोवाणी तयाच्या ॥ ४ ॥ पिटितां घणे वरि सैरा ॥ तया पोटीं राहे हिरा ॥ तैशा कायत गती गारा ॥ तया थोरा होऊनी ॥ ५ ॥ लीन दीन हेंचि सार ॥ भव उतरावया पार ॥ बुडे माथां भार ॥ तुका ह्मणे राहोनि ॥ ॥६॥ ॥ १८९२ ॥

आह्मी वीर झुंजार ॥ करूं जम दाढे मार ॥ या पटिले भार ॥ मोड झाला दोषांचा ॥ १ ॥ झाला हाहाकार ॥ आले

अंकीतझुंजार ॥ शंखचक्राचेशृंगार ॥ कंठींहारतुळसी
चे ॥ २ ॥ रामनामांकितबाण ॥ गोपिलाविलाचंदन ॥
झळकतीनिशाण ॥ गरुडटकेपताका ॥ ३ ॥ तुकाह्मणे
काळ ॥ झालोंजिंकोनीनिश्चळ ॥ पावलासकळ ॥ भो
गआह्माआमुचा ॥ ४ ॥ ॥ १८९३ ॥
आशाबद्धतोचिजगाचाहीदास ॥ पूज्यतोउदाससर्वज
ना ॥ १ ॥ आहेतेंआधीनआपुलेबाहतीं ॥ आणिकाठे
वितीकायबोल ॥ २ ॥ जाणतियापाठींलागलाउपाध ॥
नेणतासावधभोजनासी ॥ ३ ॥ तुकाह्मणेभयबांधीयलें
गांठी ॥ चोरलागेपाठीधुमतया ॥ ४ ॥ ॥ १८९४ ॥
आणिकासिऐसीनाहींरिपाहणीं ॥ धडतेनासुनिभल
ताटाकी ॥ १ ॥ सोनेशुद्धहोतेंअविटतेंघरीं ॥ नासीले
सोनारींअळंकार ॥ २ ॥ बोलशुद्धकाळींकाळीजिरेबी
ज ॥ कैचेलागेनीजहातींतिथें ॥ ३ ॥ येकगहुकरीअने
कप्रकार ॥ सांजादिवशींक्षीरघुगरीया ॥ ४ ॥ तुकाह्म
णेंवीषारुच्चियेकाहातीं ॥ पाधानीनासीतीनवनीत ॥
॥ ५ ॥ ॥ १८९५ ॥
वाटेयाजनाचेंथोरहेआश्चिर्य ॥ नकरितीविचारहिता
चातो ॥ १ ॥ कोणदमऐसाआहेयाचेपोटीं ॥ येईलशे
वटींकोणकामा ॥ २ ॥ कायमानुनीयांराहिलेनिश्चि
ती ॥ कायजाबदेतीयमदूतां ॥ ३ ॥ कांहेविसरलीमर
णबापुडीं ॥ काययासीगोडीलागलीसे ॥ ४ ॥ कायहातीं
नाहींकरिलतयासी ॥ कायझालेंयासीकोणजाणे ॥ ५ ॥

कांहेनाठवीती देवकीनंदना ॥ सुटायाबंधनापासुनी
यां ॥ ६ ॥ कायमोलयासीलागेधनवित्त ॥ कांहेंयाचें
चित्तघेतनाहीं ॥ ७ ॥ तुकाह्मणेकांहेभोगीतीलखाणीं ॥
कांत्याचक्रपाणीवीसरली ॥ ८ ॥ ॥ १८९६ ॥
काययेकाझालेंतेंकांनाहींठावें ॥ कायहेंसांगावेंकाय
ह्मणूं ॥ १ ॥ देखतिलडोळांअईकतिकानीं ॥ बोलीलेपु
राणींतेंचिठावें ॥ २ ॥ कायहेंशरीरसाचकींजाणार ॥
सकळविचारजाणतिहा ॥ ३ ॥ कांहेंकळोंनयेआपुलें
आपणा ॥ बालत्वतारुण्यावृद्धदशा ॥ ४ ॥ कांहेंआव
डलेंप्रियापुत्रधन ॥ कायकामाकोणकोणाआलें ॥ ५ ॥
कांहेंजन्मवायांघातलेंउत्तम ॥ कांहेंरामरामनह्मणती
॥ ६ ॥ कायभूलीयासीपडलीजाणतां ॥ देखतिमरतां
आणिकासी ॥ ७ ॥ कायकरितीहेबांधलीयाकाळें ॥ तु
काह्मणेबळेंवज्रपाशीं ॥ ८ ॥ ॥ १८९७ ॥
झुंजारतेयेकविष्णूदासजगीं ॥ पापपुण्यअंगींनातळे
त्या ॥ १ ॥ गोविंदआसनींगोविंदशयनीं ॥ गोविंदत्या
मनींबैसलासे ॥ २ ॥ ऊर्ध्वपुंड्रभाळकंठींशोभेमाळ ॥
कापीजेकळिकाळतयाभेणें ॥ ३ ॥ तुकाह्मणेशंखच
क्राचेशृंगार ॥ नामामृतसारमुखामाजी ॥ ४ ॥ १८९८ ॥
आपुलेंस्वहीतपुढिलाचाघात ॥ इच्छीतसेनित्यअभा
गीतो ॥ १ ॥ संचितासीजायमिळोनियांखोडी ॥ पत
नासीजोडीवरिहाव ॥ २ ॥ बांधलेंगांठीतेंलागतेंभो
गावें ॥ ऐसीयासीजीवेंकायकीजे ॥ ३ ॥ तुकाह्मणेज

यगांवाजाणेजया ॥ पुसोनीयांतयावाटचाले ॥ ४ ॥
॥१८९९॥

मानिभक्तांचेउपकार ॥ रुणियाह्मणवीनिरंतर ॥ केलानिर्गुणीआकार॥ कीर्तिमुखेंवर्णितां ॥ १ ॥ ह्मणोनिजयाजेवासना॥ तेपुरवीपंढरिराणा ॥ झालाभक्तांचाआंदणा ॥ तेउपकारफेडाया ॥ २ ॥ अंबऋषीकारणें॥ जन्मघेतलेनारायणें॥ येवढेंभक्तीचेंलाहाणें॥ दास्यकरीदासांचे ॥ ३ ॥ आणिककरितांशंकानधरी ॥ रक्षपाळबळिचेद्वारीं ॥ भक्तीचाआभारी ॥ रीगनपुरे जावया॥४॥ अर्जुनाचेरथवारू॥ तेवागवीसर्वेश्वरू॥ येवढेभक्तीचेउपकारू ॥ मागेंमागेंहिंडतसे ॥ ५ ॥ पुंडलिकाचेद्वारीं ॥ समपाउलेंविटेवरी ॥ नवजेकटकरी॥ धरुनितेथेंराहिला॥ ६ ॥ भावभक्तीचाअंकित ॥ नाम साजेदीनानाथ ॥ ह्मणोनीराहिलानिवांत ॥ तुकाचरणधरून॥ ७॥
॥१९००॥

सांगोंजातीशकुन ॥ भूतभविष्यवर्तमान ॥ १ ॥ त्याचाआह्मासीकांटाळा ॥ पाहोनावडतिडोळां ॥ २ ॥ रिद्धिसीद्धीचेसाधक॥ वाचासिद्धीहोतीयेक ॥ ३ ॥ तुकाह्मणेजाती॥ पुण्यक्षयें अधोगती॥ ४॥
॥१९०१॥

ठाकलोंसेंद्वारीं ॥ उभेयाचकभिकारी॥ १॥ मजभीककांहींदेवा॥ प्रेमभातुकेंपाठवा॥ २॥ याचकांचाभार॥ नयेघेऊंवेरझार ॥ ३ ॥ तुकाह्मणेदान ॥ सेवाघेतल्यावांचून॥ ४॥
॥१९०२॥

ऐसेंकांझालेंतेंमजहीनकळे ॥ कीर्तनाचेरळेपळेजगीं
॥ १ ॥ कैसेंतुह्मादेवावाटतसेबरें ॥ संतांचींउत्तरेंलाज
बीलीं ॥ २ ॥ भावीकांकंटककरितातिपीडा ॥ हातवरी
कढाअनुभव ॥ ३ ॥ तुकाह्मणेनामनिर्वाणिचात्राण ॥
याचाअभीमाननाहींतुह्मा ॥ ४ ॥ ॥ ११०३ ॥
तुह्मीबैसलेतीनिर्गुणाचेखोळे ॥ आह्माकांहिडोळेकान
दिल्हे ॥ १ ॥ नाइकावेतुझीअपकीर्तिदेवा ॥ अव्हेरिलीसे
वानदेखवे ॥ २ ॥ आपुलेपोटींतोराखीयेलावाव ॥ आ
ह्मासिकांभावअल्पदिह्मा ॥ ३ ॥ तुकाह्मणेदुःखीऐसेहेक
ळोंघा ॥ पुढिलीयाधंद्यामननेघे ॥ ४ ॥ ॥ ११०४ ॥
अवघींभूतेंसाम्यआलीं ॥ देखिलींम्यांकैहोतीं ॥ १ ॥
विश्वासतोखरामग ॥ पांडुरंगकृपेचा ॥ २ ॥ माझीको
णीनधरोशंका ॥ ऐसेहोकांनिर्द्वंद्व ॥ ३ ॥ तुकाह्मणेजेंजें
भेटें ॥ तेंतेंवाटेंमीऐसें ॥ ४ ॥ ॥ ११०५ ॥
सोंगेंछंदेंकांहीं ॥ देवजोडेऐसेंनाहीं ॥ १ ॥ साराअवघे
गाबाळ ॥ डोळ्यांआडीलपडळ ॥ २ ॥ शुद्धभावावीण ॥
जोजोकेलातोतोशिण ॥ ३ ॥ तुकाह्मणेकळे ॥ परिहो
तातीअंधळे ॥ ४ ॥ ॥ ११०६ ॥
सत्यसंकल्पाचादातानारायण ॥ सर्वकरिपूर्णमनोरथ
॥ १ ॥ येथेंअळंकारशोभतिसकळ ॥ भावबळेंफळइ
च्छेचेंतें ॥ २ ॥ अंतरींचेंबीजजाणेकळवळा ॥ व्यापक
सकळांब्रह्मांडाचा ॥ ३ ॥ तुकाह्मणेनाहींचालततातडी ॥
प्राप्तकाळघडीआल्याविण ॥ ४ ॥ ॥ ११०७ ॥

कायवाणुआतांनपुरेहेवाणी॥मस्तकचरणींठेवितसें॥
॥ १ ॥ थोरीवसांडिलीआपुलीपरिसें॥नेणसीवोकैसें
लोखंडेसी॥ २ ॥ जगाच्याकल्याणासंतांच्याविभूती॥
देहकष्टवीतीउपकारें ॥ ३ ॥ भूतांचितेंदयाभांडवलसं
तां॥आपुलीममतानाहींदेहीं॥ ४ ॥ तुकाह्मणेसुखपरा
वियासुखें॥अमृतहेंमुखेंस्रवतसे॥५॥ ॥१९०८॥
जन्माआलोंत्याचे॥आजिफळझालेंसाचें॥ १ ॥तुह्मी
सांभाळीलेंसंतीं॥भयनीरसलीखंती ॥ २ ॥ कृतकृत्य
झालों॥इच्छाकेलीतेंपावलों ॥ ३ ॥ तुकाह्मणेकाळ॥
आतांकरूंनसकेबळ॥ ४ ॥ ॥१९०९॥
कायपुण्यराशी ॥गेल्याभेदूनीआकाशीं ॥ १ ॥ तुह्मी
झालेतिकृपाळ ॥माझाकेलाजीसांभाळ ॥ २ ॥ काय
वोळलेंसंचित॥ऐसेंनेणें अगणित॥३॥ तुकाह्मणेनेणे॥
कायकेलेंनारायणें॥ ४ ॥ ॥१९१०॥
असेयेथेंचियादिने ॥ भाग्यहीनेसकळा ॥ १ ॥ भांड
वलयेवढेंगांठी॥नामकंठींधरियेलें॥ २॥ आणीकतेंदु
जेंकांहीं॥मज़नाहींयावरी॥३॥ तुकाह्मणेकेलाकोणे॥
येवढानेणेंलौकीक॥ ४ ॥ ॥१९११॥
गायनाचेवाहेटाळी॥साधनकलीउत्तमहे ॥ १ ॥काय
जाणोतरलेकीती॥नावअयतियाबैसा॥२॥ सायासा
चेंनाहींकाम॥घेतांनामविठोबाचें ॥ ३ ॥ तुकाह्मणेनि
र्वाणीचें ॥शस्त्रसाचेंहेंयेक॥ ४ ॥ ॥१९१२॥
सर्वकाळमाझेचित्तीं॥हेचिखंतीराहीली ॥ १ ॥ बैसलें

तेंरूपडोळां॥ वेळोवेळां आठवे ॥ २ ॥ वेव्हाराचीसरली
मात॥ अखंडीतअनुसंधान॥३॥ तुकाह्मणेवेधझाला॥
अंगाआलाश्रीरंग ॥ ४॥ ॥१९१३॥
जैसेंदावीतैसाराहे॥ तरिकांदेवदूरीआहे॥ १ ॥ दुःखपा
वायाचेंमूळ॥ रहणिठावनाहींताळ॥२॥ माळामुद्राव
रि॥ कैंचासोंगेंजोडेहरि ॥ ३ ॥ तुकाह्मणेदेख ॥ ऐसीप
रीचीबहुतेक॥ ४॥ ॥१९१४॥
औघातोशकुन॥हृदईंदेवाचेचरण॥१॥ येथेनसतांवि
योग॥लाभाउणेकायमग॥२॥ संगहरिच्यादासाचा॥
शुचिर्भूतसदांवाचा ॥ ३ ॥ तुकाह्मणेहरिच्यादासा ॥
शुभकाळअवघ्यादिशा॥ ४॥ ॥१९१५॥
ब्रह्मरूपाचींचकर्मेंब्रह्मरूप॥विरहितसंकल्पहोतीजाती
॥ १ ॥ ठेवीलीयादीसेरंगाऐसीशीळा ॥ उपाधीनिरा
ळास्फटिकमणी ॥ २ ॥ नानाभाष्यमातेंआळवीती
बाळें॥प्रबोधीतांमूळजननीठाईं ॥ ३ ॥ तुकाह्मणेमा
झेंनमनजाणतीया ॥ लागतसेपायांवेळोवेळां ॥ ४ ॥
॥१९१६॥
नाहींसुगंधाचीलागतलावणी॥लावावींतिमनींशुद्धहो
तां॥ १ ॥वाऱ्याहातींमापचालेसज्जनाचें॥ कीर्तिमुख
त्याचेंनारायण॥२॥ प्रभाआणिरवीकायअसेआन॥
उदईंतेजनसकळसाक्षी ॥ ३ ॥ तुकाह्मणेबरासत्याचा
सायास॥ नवनीतानासनाहींपुन्हा॥ ४॥ ॥१९१७॥

तीर्थाटणेंयेकतपेंहुंबरती ॥ नाथीलेधरीतीअभीमान ॥ १ ॥ तैसेविष्णुदासनव्हतिसाबडे ॥ येकाचीयापडे पायांयेक ॥ २ ॥ अक्षरेंआणितीजाणीवअंगासी ॥ इच्छातेगौरवाशीपून्यव्हावें ॥ ३ ॥ तुकाह्मणेविधि निषेधाचेडोहीं ॥ बुडालेत्यानाहींदेवकधीं ॥ ४ ॥

॥ १९१८ ॥

पट्टेढाळूंआह्मीविष्णुदासजगीं ॥ लागोनेदुअंगींपाप पुण्य ॥ १ ॥ निर्भरअंतरींसदासर्वकाळ ॥ घेतलासक ळभारदेवें ॥ २ ॥ बळिवंतजेणेंरचिलेंसकळ ॥ आह्मा त्याचेंबळअंकीतासि ॥ ३ ॥ तुकाह्मणेआह्मीदेखतच्चि नाहीं ॥ देवावीणकांहींदुसरेंतें ॥ ४ ॥ ॥ १९१९ ॥

कथेचाउल्लंघतोअधमाअधम ॥ नावडेज्यानामवोळ खातो ॥ १ ॥ कासयाजिऊनझालाभूमीभार ॥ आनउ पकारमातेकूसी ॥ २ ॥ निद्रेचाआदरजागरणींवीट ॥ त्याचेपोटींकीटकुपथ्याचें ॥ ३ ॥ तुकाह्मणेदोन्हींबुडवि. लींकुळें ॥ ज्याचेंतोंडकाळेंकथेमाजी ॥ ४ ॥ ॥ १९२० ॥

सांडानीदोंअक्षरा ॥ कायकरूंहापसारा ॥ विधीनिषेधा चाथारा ॥ तेणेंदातारानातुडसी ॥ १ ॥ ह्मणोनीयोब ध्याउत्तरीं ॥ वाचेजपेनिरंतरीं ॥ नामतुझेंहरि ॥ भवसा गरींतारूंतें ॥ २ ॥ सर्वमयवेदाचेंवचन ॥ श्रुतिगर्जति पुराणें ॥ नाहींआनधन ॥ साधनमजचाड ॥ ३ ॥ शेव टींब्रह्मार्पण ॥ याचिमंत्राचेंकारण ॥ कानामात्रावार्यां वीण ॥ तुकाह्मणेचिंदुली ॥ ४ ॥ ॥ १९२१ ॥

हरिनामाचेंकरूनीतारूं ॥ भवसिंधुपारुउतरलों ॥ १ ॥
फावलेंफावलेंआतां ॥ पाईसंतांविनटलों ॥ २ ॥ हरि
नामाचाशस्त्रघोडा ॥ संसारगाढाछेदिला ॥ ३ ॥ हरिना
माचेंधनुष्यकांड ॥ विन्मुखतोंडकळिकाळ ॥ ४ ॥ येणे
चिबळेंसरतेआह्मी ॥ हरीच्यानामींलोकतीहीं ॥ ५ ॥
तुकाह्मणेझालेंसाचे ॥ श्रीविठ्ठलाचेंडिगर ॥ ६ ॥
॥ १९२२ ॥
नव्हेहेंगुरुत्वमेघवृष्टीवाणी ॥ आयकावीकानींसंतज
नीं ॥ १ ॥ आरुषहाशब्ददेवाचाप्रसाद ॥ करविलावाद
तैसाकेला ॥ २ ॥ देहपिंडदानदिल्हायेकसरें ॥ मुळींचें
तेंखरेंढाळसाळ ॥ ३ ॥ तुकाह्मणेझरालागलानवनीत ॥
सेवीलीयाहीतपोटधायें ॥ ४ ॥ ॥ १९२३ ॥
घटींअलिप्तअसेरवी ॥ अग्निकाष्ठामाजीतेवी ॥ तैसा
नारायणजेवीं ॥ जीवसाक्षीवर्तणें ॥ १ ॥ भोगज्याचे
तयाअंगीं ॥ भिन्नप्रारब्धतेंजगीं ॥ विचित्रयेरंगीं ॥ रंगे
रंगलागोसावी ॥ २ ॥ देहेसंकल्पासारिखे ॥ येकयेका
सीपारिखे ॥ सुखआणिदुःखें ॥ अंगींकर्मेंत्रिविध ॥ ३ ॥
तुकाह्मणेकोडें ॥ नकळेतयासीसांकडें ॥ त्याचियानी
वाढे ॥ येवढेंकेलेंविंदान ॥ ४ ॥ ॥ १९२४ ॥
सद्गदीतकंठदाटो ॥ येणेफुटोल्हृदय ॥ १ ॥ चिंतनाचाये
कलाहो ॥ तुमच्याआहोविठ्ठला ॥ २ ॥ नेत्रींजळवाहे
सदां ॥ आनंदाचेरोमांच ॥ ३ ॥ तुकाह्मणेकृपादान ॥ इ
च्छीमनहेजोडी ॥ ४ ॥ ॥ १९२५ ॥

जेथेंदेखेंतेथेउभा॥ औघ्यागगनाचागाभा ॥ १ ॥ डो
ळांवैसलेंबैसले॥ध्यानराहोनीसंचले॥ २ ॥ सरसाव
लेंमन॥ केलेंसोज्वळलोचन ॥ ३ ॥ तुकाह्मणेसवें ॥
आतांअसिजेतदेवें ॥ ४॥ ॥१९२६॥
तान्हेतान्हप्याली ॥ भूकभूकेनेंखादली॥ १ ॥ जेथेंतेच
नाहींझाले ॥ झाडाघेतलाविठ्ठलें॥ २ ॥ वासवासनेसी
नाहीं ॥ मनपांगुळलेंपाईं ॥ ३ ॥ शेषउरलातुका ॥ जी
वींजीवाझालाचुका॥ ४॥ ॥१९२७॥
पाणिपात्रदिगंबरा ॥ हस्तकरासारिखे ॥ १ ॥ अवश्य
केदेवमनीं ॥ चिंतनीचसादर॥ २॥ भिक्षाकामधेनुऐ
सी॥ आवकासीशयन ॥ ३॥ पांघरूनतुकादिशा॥ के
लावासअलक्षी ॥ ४॥ ॥१९२८॥
विषईंविसरपडिलानिःशेष॥ अंगींब्रह्मरसठसावला॥
॥ १ ॥ माझीमजझालीअनावरवाचा ॥ छंदयाना
माचाघेतलासे॥ २॥ लाभाचियासोसेपुढेंचालेमन॥
धनाचाकृपणलोभीजैसा॥३॥ तुकाह्मणेगंगासागरसं
गमीं॥ अवघ्याझाल्याऊर्मियेकमय ॥ ४॥ १९२९॥
कृष्णरामनाममांडीलीपावोळी ॥ तेणेहोईलधूळीपा
पाधुणी॥ १ ॥ऐसामनाछंदलाविरेअभ्यास ॥ जया
नाहींनाशब्रह्मरसा॥ २ ॥ जोडितरिऐसीकरावीनसरे॥
पुढेंअसेउरेमागुताली ॥ ३ ॥ तुकाह्मणेऐसेंधराकांहीं
मनीं ॥ यातायातिखाणिचुकतील ॥ ४ ॥ १९३० ॥
परमार्थीतोनह्मणावाआपुला॥ सलगीधाकूलाहेळूंन

ये ॥ १ ॥ थोडाचिस्फुलिंगबहुतदावाग्नी ॥ वाढतांइंध
नींवाढवीला ॥ २ ॥ पितयानेतैसावंदावाकुमर ॥ जया
चेअंतरींदेववसे ॥ ३ ॥ तुकाह्मणेशीरींवाहावेंखाप
र ॥ माजिअसेसारनवनीत ॥ ४ ॥ ॥ १९३१ ॥
ज्याचाऐसाअनुभव ॥ विश्वदेवसत्यत्वें ॥ १ ॥ देवत
याजवळीअसे ॥ पापनासेदरुशने ॥ २ ॥ कामक्रोधा
नाहींचाली ॥ भूतींझालीसमता ॥ ३ ॥ तुकाह्मणेभेदाभे
द ॥ गेलेवादखंडोनी ॥ ४ ॥ ॥ १९३२ ॥
सेवातेआवडीउच्चारावेंनाम ॥ भेदाभेदकामनिवारू
नी ॥ १ ॥ नलगेहालावेंचालावेंबाहेरी ॥ अवघेंचिघ
रींबैसलिया ॥ २ ॥ देवाचींचनामेंदेवाचियेशीरीं ॥ स
र्वअलंकारींसमर्पावे ॥ ३ ॥ तुकाह्मणेहोयभावेंचिसं
तोषी ॥ वसेनामापासीआपुलीया ॥ ४ ॥ ॥ १९३३ ॥
ज्ञानीयाचेघरींचोजवितादेव ॥ तेथेअहंभावपाठीलागे
॥ १ ॥ ह्मणवोनीऔघेसांडिलेउपाय ॥ धरियेलेपायदृ
ढतुझे ॥ २ ॥ वेदपारायणपंडितवाचक ॥ नमिळतीये
कयेकामधीं ॥ ३ ॥ पाहोगेलोंभावकैसीआत्मनिष्ठा ॥
तेथेदेखेंचेष्टाविपरीत ॥ ४ ॥ आपुलीयानाहींनिवाले
जेअंगें ॥ येकीकरितीरागेंगुरुगुरु ॥ ५ ॥ तुकाह्मणेमज
कोणाचापांगीला ॥ नकोबाविठ्ठलाकरूंआतां ॥ ६ ॥
॥ १९३४ ॥
पंढरिचीवाटपाहेनिरंतर ॥ निढळावरीकरठेऊनीयां ॥
॥ १ ॥ जातियानीरोपपाठवीमाहेरा ॥ कांमजसासुरा

सांडियेले ॥ २ ॥ पैलकोणगरुडाचेपारिखे ॥ विठ्ठला
सारिखेचतुर्भुज ॥ ३ ॥ तुकाह्मणेधीरनाहींमाझ्याजी
वा ॥ भेटसींकेधवापांडुरंगा ॥ ४ ॥ ॥ १९३५ ॥
ऐसीजोडीकरारामकंठींधरा ॥ जेणेचुकेफेरागर्भवास
॥ १ ॥ नाशीवंतआठिप्रियापुत्रधन ॥ बीजज्याचाशी
णतेंचीफळ ॥ २ ॥ नावधडकरासहस्रनामाची ॥ जेभ
वसिंधूचिथडीपावे ॥ ३ ॥ तुकाह्मणेकाळाहाणातोंडा
वरी ॥ भाताभराहरिनामबाणें ॥ ४ ॥ ॥ १९३६ ॥
पाहेंमजकडेभरुनियादृष्टी ॥ बहुतहिंपुटीझालोंमाते ॥
॥ १ ॥ करावेंसेंवाटेजीवास्तनपान ॥ नव्हेहेंवचनश्रृंगा
रीक ॥ २ ॥ सत्यासाठींमाझीशब्दविवंचना ॥ जोडि
ल्यावचनाचेतेनव्हे ॥ ३ ॥ तुकाह्मणेमाझीकळवळ्याची
कीव ॥ भागलासेजीवकर्तव्यानें ॥ ४ ॥ ॥ १९३७ ॥
तुजह्मणतीलकृपेचासागर ॥ तरिकांकेलाधीरपांडुरं
गा ॥ १ ॥ आझुनिकांनयेतुजमाझीदया ॥ कायदेवरा
यापाहातोसी ॥ २ ॥ आळवितोजैसेपाडसकुरंगिणि ॥
पीडीलीयावन्हींतानभूक ॥ ३ ॥ प्रेमरसपान्हापाजिमा
झेआई ॥ धांवेवोविठाईवोरसुनी ॥ ४ ॥ तुकाह्मणेमा
झेंकोणवारीदुःख ॥ तुजवीणयेकपांडुरंगा ॥ ५ ॥
॥ १९३८ ॥
भक्तितेकठीणसुळावरिलपोळी ॥ निवडेतोबळीविर
ळाजाणे ॥ १ ॥ जेथेपाहेतेथेंदेखीचापर्वत ॥ पापावी
णभिंततातडीची ॥ २ ॥ कामावीलेंतरीपाकावोजघडे ॥

रुचिआणिजोडेश्लाघ्यताहे॥३॥तुकाह्मणेमनापाहि
जेअंकुश॥नित्यनवादीसजागृतीचा॥४॥१९३९॥
पापीह्मणोंतरिआठवितोंपाय ॥ दोषवळीकायतया
हूनी॥ १॥ ऐशाविच्यारांचीघालोनीकोंडणी॥ काय
चक्रपाणीपाहातोसी॥ २॥ येकवेळेजेणेपुत्राच्याउद्दे
शें॥घेतल्याचेंकैसेंनेलेंदुःख॥ ३ ॥ तुकाह्मणेअहोवै
कुंठनायका॥चिंताकांसेवकातुमचीया॥४॥१९४०॥
उगविल्यागुंती॥ऐशामागेनेणोकिती॥१॥ख्यातिके
लीअजामीळें॥होतेंनिघालेंदीवाळें॥२॥मोकलीला
प्रायश्चित्तीं॥कोणिनधरीतीहातीं॥३॥तुकाह्मणे
मुक्तवाट॥वैकुंठीचीघडघडाट॥४॥ ॥१९४१॥
सरळहींनामेंउच्चारावींसदा॥ हरिगोविंदारामकृ
ष्णा॥१॥पुण्यपर्वकाळतीर्थेंहीसकळ॥कथासिंधुज
ळन्हावोयेती॥२॥अवघेचींलाभेबैसलीयाघरा॥ये
तीभावधरायेकेठाई॥३॥सेव्यामेंव्यागाईसेवाघेती
ह्मैसी॥कामधेनुतैसीनव्हेयेक॥४॥तुकाह्मणेसुखपा
विजेअनंता॥हेंवर्मजाणतांसुलभचि॥५॥१९४२॥
पवित्रतोदेहवाणीपुण्यवंत॥जोवदेअच्युतसर्वकाळ
॥१॥तयाच्याचिंतनेंतरतीलदोषी॥जळतीलराशीपा
तकांच्या॥२॥देवइच्छीरजचरणीचीमाती॥धांवत
चालतीमागेंमागें॥३॥कायत्याउरलेंवेगळेंआणिक॥
वैकुंठनायकजयाकंठीं॥४॥तुकाह्मणेदेवभक्तांचासं
गम॥तेथेवोघनामत्रिवेणीचा॥५॥ ॥१९४३॥

पापतापदैन्यजायऊठाऊठी ॥ झालीयाहीभेटीहरिदा
सांची॥ १ ॥ ऐसेंबळनाहींआणिकाचेअंगीं ॥ तपेती
थैंजगींदानेंव्रतें॥२॥ चरणींचेरजवंदीशूळपाणी॥ना
चतीकीर्तनींत्याच्यामाथा॥ ३ ॥ भवतरावयाउत्तमहे
नाव॥ भिजोनेदीपावहातकांहीं॥ ४॥ तुकाह्मणेमना
झालेंसमाधान ॥ देखिलेचरणवैष्णवांचे ॥ ५ ॥
॥१९४४॥
येणेबोधेंआह्मीअसोंसर्वकाळ ॥ करूंहेनिर्मळहरिक
था॥ १ ॥ आह्मीभूमीवरियेकपैंदैवाचे॥निधानहेंवाचें
सांपडलें ॥ २ ॥ तरतीलकुळेंदोन्हींउभयतां॥गातांआ
इकतांसुखरूप ॥ ३ ॥ नकळेहामंत्रनह्मणेयातीकूळ॥
नलगेकाळवेळविचारावी ॥ ४ ॥ तुकाह्मणेमाझावि
ठ्ठलविसावा॥सांठवीनहावाह्रदयांत॥ ५॥ १९४५ ॥
बहुतांजन्मांचेंसंचित ॥ सबळहोयजरीबहुत॥ तरिच
होयहरिभक्त ॥ रूपावंतमानसीं ॥ १ ॥ ह्मणवीह्मणि
याराहयाचा॥दासआपुल्यादासाचा॥ अनुसरलेवा
चा॥कायामनेंविठ्ठलीं ॥ २॥ असेभूतदयामानसीं॥
औघादेखेऋषिकेशी ॥ जीवेंनविसंबेतयासी ॥ मागें
मागेंहिंडतसे ॥ ३ ॥ तुकाह्मणेनिर्विकार॥ शरणागतां
वज्रपंजर ॥ जेजेअनुसरलेनर ॥ तयाजन्मचुकले ॥
॥ ४ ॥ ॥१९४६॥
तारूंलागलेंबंदरीं ॥ चंद्रभागेचियेतीरीं॥ १ ॥ लुटालु
टासंतजन॥ अमुपहेराशीधन॥ २ ॥ झालाहरिनामा

च्यातारा॥ शीडलागलेंफरारा ॥ ३॥ तुकाजवळीहमा
ल॥ भारचालवीविठ्ठल॥ ४॥ ॥१९४७॥
आळवीनस्वरें॥ कैशामधुराउत्तरें ॥ १॥ येवोयेवोपां
डुरंगे॥ प्रेमपान्हामजदेगे॥ २॥ पसरोनीचोंची॥ वच
नेंहेंकरुणेची॥ ३॥ तुकाह्मणेबळी ॥ आह्मीलडीवाळें
आळी॥ ४॥ ॥१९४८॥
सकळीकांचेंसमाधान ॥ नव्हेंदेखील्यावांचून॥ १ ॥
रूपदाखवीरेआतां॥ सहस्रभुजाच्यामंडिता॥ २॥ शं
खचक्रपद्मगदा॥ गरुडासहितयेगोविंदा ॥ ३ ॥ तुका
ह्मणेकान्हा॥ भूकलागलीनयना॥ ४॥ ॥१९४९॥
पतितपावना॥ दिनानाथानारायणा ॥ १ ॥ तुझेंरूप
माझेमनीं॥ राहोंनामजपोवाणी ॥ २॥ ब्रह्मांडनाय
का॥ भक्तजनाच्यापाळका॥ ३॥ जीविंचीयाजीवा॥
तुकाह्मणेदेवदेवा ॥ ४॥ ॥१९५०॥
करींहेंचिकाम॥ मनाजपेरामराम॥ १ ॥ लागोहाची
छंद॥ मनागोविंदगोविंद ॥ २॥ तुकाह्मणेमना॥ म
जभीकद्यावीदीना॥ ३॥ ॥१९५१॥
आपूलीयालाजा॥ धांवभक्ताचीयाकाजा॥ १ ॥नाम
धरिलेंदीनानाथ॥ सत्यकरावयाव्रत॥ २॥ घातअघा
तनिवारी॥ छायापितांबरेंकरी ॥ ३ ॥ उभाकरकटी ॥
तुकाह्मणेयाजसाठीं॥ ४॥ ॥१९५२ ॥
साधावयाभक्तकाज॥ नाहींलाजधरित ॥ १ ॥ ऐसी

यासीशरणजावें ॥ शक्तिजीवेंनवंची ॥ २ ॥ भीष्मेंपण
केलाखरा ॥ धनुर्धररारक्षीले ॥ ३ ॥ तुकाह्मणेसाक्षहा
तीं ॥ तोम्याचित्तींधरियेला ॥ ४ ॥ ॥ १९५३ ॥
धेनुचरेवनांतरीं ॥ चित्तबाळकापेंघरीं ॥ १ ॥ ऐसेंकरीं
वोमाझेआई ॥ ठावदेवोनीराखेंपाई ॥ २ ॥ काढीतांत
ळमळी ॥ जीवनाबाहेरीमासोळी ॥ ३ ॥ तुकाह्मणेकु
डी ॥ जीवाप्राणाचीआवडी ॥ ४ ॥ ॥ १९५४ ॥
हरिजनाचीकोणानघडावीनिंदा ॥ साहातगोविंदाना
हींत्याचें ॥ १ ॥ रूपायेवोनियांधरीअवतार ॥ भक्तांअभ
यकरखळांकष्ट ॥ २ ॥ दुर्वासयाछळोंआलाअंबऋषी ॥
सुदर्शनत्यासीजाळितफिरे ॥ ३ ॥ द्रौपदीच्याक्षोभेंकौ
रवांचीशांती ॥ होउनीश्रीपतिसाह्यकेलें ॥ ४ ॥ नसाहे
चिबभ्रुपांडवापारिखा ॥ धुंडावीलासखाबळिभद्र ॥ ५ ॥
तुकाह्मणेअंगींराखिलीदुर्गंधी ॥ अश्वत्थामावधीपांड
वपुत्रा ॥ ६ ॥ ॥ १९५५ ॥
ज्यासीआवडीहरिनामाची ॥ तोचियेकबहुशुची ॥ १ ॥
जपतोहरिनामबीज ॥ तोचिवर्णामाजीद्विज ॥ २ ॥ तु
काह्मणेवर्णधर्म ॥ अवघेंआहेसमब्रह्म ॥ ३ ॥ १९५६ ॥
विठ्ठलहाचित्तीं ॥ गोडलागेगातांगीतीं ॥ १ ॥ आह्मा
विठ्ठलजीवन ॥ टाळचिपळीयाधन ॥ २ ॥ विठ्ठलविठ्ठल
वाणी ॥ अमृतहेसंजीवनी ॥ ३ ॥ रंगलायारंगें ॥ तुकावि
ठ्ठलसर्वांगें ॥ ४ ॥ ॥ १९५७ ॥
विठ्ठलविठ्ठलमंत्रसोपा ॥ करीपापानिर्मूळ ॥ १ ॥ भा

ग्यवंताछंदमनीं॥ कोडकानींऐकती ॥ २ ॥ विठ्ठलहेंदे
वतभोळें॥ चाडकाळेंनधरावी ॥ ३ ॥ तुकाह्मणेभलते
याती॥ विठ्ठलचित्तींशुद्धते॥ ४॥ ॥ १९५८॥
ह्मणेविठ्ठलब्रह्मनोव्हे॥ त्याचेबोलनायकावे ॥ १ ॥ म
गतोहोकाकोणीयेक ॥ आदिकरूनीब्रह्मादिक ॥ २ ॥
जयाविठ्ठलनाहींठावा ॥ तोहिडोळांनपाहावा ॥ ३ ॥
तुकाह्मणेनाहीं॥ त्याचीभीडमजकांहीं॥ ४॥ १९५९॥
येकपाहातसायेकाचिदहनें॥ सावधत्यागुणेंकांरेनव्हा
॥ १ ॥ माराहाकदेवाभयेअट्टाहास्य ॥ जवकाळाऐसें
झालेंनाहीं ॥ २॥ मरणाचीतवगाठोंळिपदरीं ॥ जिणे
तोचिवरीमापभरे॥ ३॥ तुकाह्मणेधीगवाहतीमारग ॥
अंगाआलेंमगहालोंनेदी॥ ४॥ ॥१९६०॥
संतांसीतेनाहींसन्मानाचीचाड ॥ परिपीडेद्वाडआव्हे
रीतो ॥ १ ॥ ह्मणवोनीतयानवजावेंठायां॥ होतसेघा
तयादुर्बळाचा॥ २॥ भावहीनाआडयेतसेआशंका ॥
उचितासीचुकाघालावया ॥ ३॥ तुकाह्मणेजयासंको
चदर्शनें॥ तयाठायाजाणेंअनुचित॥४॥ ॥१९६१॥
संवसारसंगेंपरमार्थजोडे॥ऐसेंकायघडेजाणतेना॥ १
हेंढग्याचीआळाअवघीचीपाड ॥ कायतेथेंगोडनीव
डावी॥ २॥ ढेकणाचेबाजेसुखाचीकल्पना॥ मूर्खत्वव
चनायेऊंपाहे ॥ ३ ॥ तुकाह्मणेमद्यसांडविलीगोटी ॥
सांगीतलाशेठींविचारत्या॥ ४॥ ॥ १९६२॥
पंढरियेमाझेंमाहेरसाजणी॥ वोवीयाकांडणीगाऊंगी

ति॥१॥राहिरखुमाईसत्यभामामाता॥पांडुरंगपितामा
हीयेर॥२॥उद्धवअक्रूरव्यासअंबऋषी॥भाईनारदा
सीगौरवीन॥३॥गरुडबंधुलडिवाळपुंडलीक॥या
चेंकवतुकवाटेंमज॥४॥मजबहुगोतसंतआणिमहं
त॥नित्यआठवीतवोवीयेसी॥५॥निवृत्तिज्ञानदेव
सोपानचांगया॥जिवलगामाझीयानामदेवा॥६॥
नागोजनमित्रानरहरीसोनारा॥रोहिदासाकबिरासो
यरीया॥७॥परिसाभागवतासुरदाससांवता॥गाई
ननेणतांसकळांसी॥८॥चोखामेळासंतजीवाचेसो
ईरे॥नपडेविसरयांचाघडी॥९॥जीवींच्याजिवनाये
काजनार्दना॥पाठकहाकान्हयामिराबाई॥१०॥आ
णिकेहसंतमहानुभावमुनि॥सकळांचरणींजीवमा
झा॥११॥आनंदेंवोवियागाईनमीत्यांसी॥जातीपं
ढरिसीवारकरी॥१२॥तुकाह्मणेमाझाबळियाबाप
माय॥हर्षेनांदताहेघराच्यारी॥१३॥ ॥१९६३॥
जातिचेतेंचढप्रेम॥पक्षीस्मरेरामराम॥१॥तेकांगु
णलागतीयेरा॥कागानशोभेपिंजरा॥२॥शिकविले
सुजातसांसी॥मगमोलचढेत्यासी॥३॥तुकाह्मणेवे
षधारी॥हिजव्यानहोतीयानारी॥४॥ ॥१९६४॥
वसणेथिह्लरीं॥वेडुकसागराधिःकारी॥१॥नाहींदेखी
लानाठावा॥तोंडपीटीकरीहावा॥२॥फुगतेकाउळे॥
ह्मणेमीराजहंसाआगळे॥३॥गज्याहुनीखर॥ह्मणे
चांगलामीफार॥४॥मुलाम्याचेंनाणे॥तुकाह्मणेन

ऱ्हेसोने ॥ ५ ॥ ॥ ११६५ ॥

मुक्तहोतापरीबळेंझालाबद्ध ॥ घेउनीयाछंदमाझेंमाझें ॥ १ ॥ पापपुण्यअंगींघेतलेंजडून ॥ वर्मनेणेकोणकरितातो ॥ २ ॥ तुकाह्मणेगेलेंव्यर्थवायावीण ॥ जैसाम्टगसीणेम्टगजळें ॥ ३ ॥ ॥ ११६६ ॥

पोटलागलेंपाठीसी ॥ हिंडवितेंदशोदेशीं ॥ १ ॥ पोटाभेणेजिकडेजावें ॥ तिकडेपोटयेतेंसवें ॥ २ ॥ जपतपअनुष्ठान ॥ पोटासाठींझालेदीन ॥ ३ ॥ पोटेंसांडियेलीचवी ॥ नीचापुढेंतेंनाचवी ॥ ४ ॥ पोटकासयानेंभरे ॥ तुकाह्मणेझुरझुरुमरे ॥ ५ ॥ ॥ ११६७ ॥

॥ प्रथम भाग समाप्त. ॥